महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
CIN: U40109MH2005SGC153645

औद्योगिक संबंध विभाग,
प्रकाशगड, प्लॉट जी -९, ४ था मजला,
प्रा.अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ५१.
दूरध्वनी क्र. ६९८५२२००
Email : ciro@mahadiscom.in
irdho123@gmail.com
website- www.mahadiscom.in

जा.क्र. औसंवि/ब/ककनिस/७०वी बैठक/१२३४५ दिनांक : १३/०४/२०२६

# परिपत्रक

**विषय** :- म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधी समितीच्या ७० व्या बैठकीत घेण्यात आलेले निर्णय

********

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी कल्याण निधी समितीची ७० वी बैठक दि. २५.०३.२०२६ रोजी सांघिक कार्यालय, प्रकाशगड, वांद्रे (पू), मुंबई येथे अध्यक्ष म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधी समिती तथा संचालक (वित्त), म.रा.वि.मं. सुत्रधारी कं. मर्या., यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत सर्वानुमते खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेले आहेत.

१. प्रशासकीय परिपत्रक क्र.२९० दि.२८.०४.२०१० प्रमाणे कर्मचाऱ्यांच्या वेतनातुन दरमहा कपात करण्यात येणारी **म.रा.वि.मं.कर्मचारी कल्याण निधी वर्गणी रु. १० ऐवजी रु. १००/- या प्रमाणे दि.०१.०४.२०२६ पासुन करण्यात यावी.**

२. म.रा.वि.मं.कर्मचारी कल्याण निधीमधून तिन्ही कंपनीतील कर्मचारी व त्यांच्या अवलंबितांकरीता राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या प्रचलित तरतूदीमध्ये खालीलप्रमाणे सुधारित तरतूद करण्यात येऊन तसेच नवीन योजनांचा समावेश करुन त्यामध्ये खालीलप्रमाणे सुधारीत वाढ करण्यात येत आहे.

| अ. क्र | म.रा.वि.मं.कर्मचारी कल्याण निधी योजना प्रचलीत तरतुद | म.रा.वि.मं.कर्मचारी कल्याण निधी योजना प्रस्तावीत तरतुद |
|---|---|---|
| १ | इयत्ता १० वी उत्तीर्ण होणाऱ्या कर्मचारी पाल्यांकरीता रोख पारितोपिक (रु.५००/-) व शिष्यवृत्ती / दरवर्षी सलगता शिष्यवृत्ती इयत्ता १२ वी पर्यंत दरमहा रु.५००/- प्रमाणे **दरवर्षी रुपये ६,०००/- (रु.सहा हजार)** शिष्यवृत्ती देण्यात येते. | माध्यमिक शालांत परीक्षा (इ.१०वी) उत्तीर्ण होणाऱ्या पाल्यांना, उच्च माध्यमिक (इ.१२ वी) परिक्षा उत्तीर्ण होईपर्यंत दरमहा रु. ९००/- प्रमाणे **दरवर्षी रुपये १०,८००/- (रु.दहा हजार आठशे )** शिष्यवृत्ती देण्यात येईल. |
| २ | प्रथम वर्ष पदवी (Degree) ते अंतिम वर्ष पदवी परिक्षा उत्तीर्ण होणाऱ्या पाल्यांकरीता दरमहा रु.८००/- प्रमाणे **दरवर्षी रुपये ९,६००/- (रु. नऊ हजार सहाशे)** शिष्यवृत्ती देण्यात येते. | प्रथम वर्ष पदवी (Degree) ते अंतिम वर्ष पदवी परिक्षा उत्तीर्ण होणाऱ्या पाल्यांकरीता दरमहा रु. १२५०/- प्रमाणे **दरवर्षी रुपये १५,०००/- (रु. पंधरा हजार)** शिष्यवृत्ती देण्यात येईल. |

<table>
<tr><td>३</td><td>तिन्ही कंपन्यांतील कर्मचाऱ्यांच्या अवलंबितासाठी मेडिक्लेम योजनेमध्ये समाविष्ट नसलेल्या आजारांकरीताच्या वैद्यकीय उपचारांसाठी खालीलप्रमाणे प्रचलीत आर्थिक मदत.
<table>
<tr><td>Female Gynac Operation/ Hysterectomy Opearation</td><td>रु. १०,०००/-</td></tr>
<tr><td>Cesaerean Delivery</td><td>रु. १५,०००/-</td></tr>
<tr><td>Congenital Anomalies Requiring Operation</td><td>रु. २०,०००/-</td></tr>
<tr><td>Chronic Depression / Anxitety Neurosis / Bipolar Disorder (Also known as Manic Depression ) Panic Syndrome (Obsessive Compulsive Behaviour / Disorder)</td><td>रु. १०,०००/-</td></tr>
</table></td><td>तिन्ही कंपन्यांतील कर्मचाऱ्यांच्या अवलंबितासाठी मेडिक्लेम योजनेमध्ये समाविष्ट नसलेल्या आजारांकरीताच्या वैद्यकीय उपचारांसाठी खालीलप्रमाणे सुधारीत आर्थिक मदत.
<table>
<tr><td>Female Gynac Operation/ Hysterectomy Opearation/ Tubectomy</td><td>रु. २०,०००/-</td></tr>
<tr><td>Cesaerean Delivery</td><td>रु. ३०,०००/-</td></tr>
<tr><td>Congenital Anomalies Requiring Operation / Cerebral Palsy</td><td>रु. ४०,०००/-</td></tr>
<tr><td>Chronic Depression / Anxitety Neurosis / Bipolar Disorder (Also known as Manic Depression ) Panic Syndrome (Obsessive Compulsive Behaviour / Disorder)</td><td>रु. २०,०००/-</td></tr>
</table>
टिप :- Cesaerean Delivery करीता एक विशेष बाब म्हणून महिला कर्मचारी देखील पात्र राहतील.</td></tr>
<tr><td>४</td><td>राष्ट्रीय स्तरावर विविध क्षेत्रात विशेष प्राविण्य प्राप्त केल्यामुळे केंद्र शासनाच्या मान्यता प्राप्त संस्थेकडून दिले जाणारे पुरस्कार प्राप्त करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना रु.१५,०००/- (रु. पंधरा हजार) रोख पारितोषिक.<br>(परिपत्रक क्र. ३२८८६, दि. ०२/११/२०११- अ क्र १)</td><td>राष्ट्रीय स्तरावर विविध क्षेत्रात विशेष प्राविण्य प्राप्त केल्यामुळे केंद्र शासनाच्या मान्यता प्राप्त संस्थेकडून दिले जाणारे पुरस्कार तसेच ऑलम्पीयाड सारख्या स्पर्धेमध्ये पुरस्कार प्राप्त करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना रु.३०,०००/- (रु. तीस हजार) रोख पारितोषिक देण्यात येईल.</td></tr>
<tr><td>५</td><td>विविध क्षेत्रात जनहितार्थ संशोधन करुन शोध लावणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना योजनेत नमूद निकष परिपूर्ण करीत असल्यास त्यांना रु. १५,०००/- (रु. पंधरा हजार) रोख पारितोषिक.<br>१. C.S.I.R. केंद्र शासन संघटनेद्वारा मान्यता प्राप्त<br>२. पेटेंट मिळाल्यास<br>३. आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये शोध प्रबंध प्रसिध्द झाला असेल.<br>(परिपत्रक क्र. ३२८८६, दि. ०२/११/२०११- अ क्र २)</td><td>विविध क्षेत्रात जनहितार्थ संशोधन करुन शोध लावणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना योजनेत नमूद निकष परिपूर्ण करीत असल्यास त्यांना रु.३०,०००/- (रु. तीस हजार) रोख पारितोषिक देण्यात येईल.<br>१. C.S.I.R. केंद्र शासन संघटनेद्वारा मान्यता प्राप्त<br>२. पेटेंट मिळाल्यास<br>३. आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये शोध प्रबंध प्रसिध्द झाला असेल.</td></tr>
<tr><td>६</td><td>कर्मचाऱ्याच्या मुलीने एमबीबीएस या वैद्यकीय शाखेमध्ये प्रवेश घेतल्यास प्रोत्साहनपर रु. ५,०००/- (रु. पाच हजार) रोख पारितोषिक देण्यात येते.<br>(परिपत्रक क्र. ३२८८६, दि. ०२/११/२०११- अ क्र ५)</td><td>सन २०२५-२६ या शैक्षणिक सालापासुन कर्मचाऱ्याच्या पाल्याने एमबीबीएस या वैद्यकीय शाखेमध्ये प्रवेश घेतल्यास प्रोत्साहनपर रु.१५,०००/- (रु. पंधरा हजार) रोख पारितोषिक देण्यात येईल.</td></tr>
<tr><td>७</td><td>ज्या कर्मचाऱ्यांचे पाल्य दिल्ली येथे आयोजित प्रजासत्ताक दिनाच्या परेड / सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होतील त्यांना रु.२,०००/- (रु. दोन हजार) रोख पारितोषिक देण्यात येते.<br>(परिपत्रक क्र. ३२८८६, दि. ०२/११/२०११- अ क्र ९)</td><td>ज्या कर्मचाऱ्यांचे पाल्य दिल्ली येथे आयोजित प्रजासत्ताक दिनाच्या परेड / सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होतील त्यांना रु.५,०००/- (रु. पाच हजार) रोख पारितोषिक देण्यात येईल.</td></tr>
<tr><td>८</td><td>ज्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांची देशाबाहेर आयोजित आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यता प्राप्त क्रीडा स्पर्धा / एन. सी. सी. कॅम्प, स्कॉऊट गाईड कॅम्प मध्ये सहभागी होण्यासाठी आर्थिक मदतीची गरज असल्यास सदर स्पर्धा /कॅम्पमध्ये सहभागी होण्यापुर्वी मदत मिळण्याबाबतचा अर्ज सादर केल्यास त्यांना क.क.निधीमधून रु.२५,०००/-(रु.पंचवीस हजार) आर्थिक मदत देण्यात येते.<br>(परिपत्रक क्र. १८८८१, दि. ०६/०७/२०१२- अ क्र ६)</td><td>ज्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांची देशाबाहेर आयोजित आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यता प्राप्त क्रीडा स्पर्धा / एन. सी. सी. कॅम्प, स्कॉऊट गाईड कॅम्प मध्ये सहभागी होण्यासाठी निवड झाल्यास सहभागी झाल्याचे प्रमाणपत्र सादर करण्याच्या अटीवर त्यांना म.रा.वि.मं.क.क.निधीमधून रु.५०,०००/- (रु. पन्नास हजार) आर्थिक मदत देण्यात येईल.</td></tr>
<tr><td>९</td><td>ज्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांची देशाबाहेर आयोजित आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रीडास्पर्धेत सहभागी होण्यासाठी शासन मान्यता प्राप्त संघटनेच्या वतीने निवड झाली असेल त्यांना सदर स्पर्धेत सहभागी झाल्याचे प्रमाणपत्र सादर करण्याच्या अटीवर रु.२५,०००/- (रु. पंचवीस हजार) आर्थिक मदत देण्यात येते.<br>(परिपत्रक क्र. ३२८८६, दि. ०२/११/२०११- अ क्र ११)</td><td>ज्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांची देशाबाहेर आयोजित आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रीडास्पर्धेत सहभागी होण्यासाठी शासन मान्यता प्राप्त संघटनेच्या वतीने निवड झाली असेल त्यांना सदर स्पर्धेत सहभागी झाल्याचे प्रमाणपत्र सादर करण्याच्या अटीवर रु.५०,०००/-(रु.पन्नास हजार) आर्थिक मदत देण्यात येईल.</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| १० | कर्मचाऱ्यांचे पाल्य ज्यांचे अपंगत्व कमीत कमी ४० % मुकबधीर पाल्य ज्यांना जिल्हा शल्य चिकित्सकांकडून तसे प्रमाणपत्र मिळाले आहे, अशा कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना फक्त एकदाच तीन चाकी सायकल / श्रवणयंत्र खरेदी करण्यासाठी **रु.५,०००/- (रु.पाच हजार)** आर्थिक मदत देण्यात येते. (परिपत्रक क्र. ३२८८६, दि. ०२/११/२०११- अ क्र-७) | कर्मचाऱ्यांचे पाल्य ज्यांचे अपंगत्व कमीत कमी ४० % मुकबधीर पाल्य ज्यांना जिल्हा शल्य चिकित्सकांकडून तसे प्रमाणपत्र मिळाले आहे, अशा कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना फक्त एकदाच तीन चाकी सायकल / श्रवणयंत्र खरेदी करण्यासाठी **रु.२५,०००/- (रु.पंचवीस हजार)** आर्थिक मदत देण्यात येईल. |
| ११ | भारतीय ऑलिम्पिक संघाशी (Indian Olympic Association) संलग्न असलेल्या मान्यताप्राप्त संघटनेद्वारा आयोजित राष्ट्रीय खेळ (National Games), वरिष्ठ गट राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा (Senior National), कनिष्ठ गट राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत (Junior National) कर्मचाऱ्यांच्या पाल्यांनी सहभागी होऊन प्राविण्य (प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक) मिळविले त्यांना मान्यताप्राप्त आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत जसे ऐशियन गेम्स, ऑलिम्पिक स्पर्धा इत्यादी स्पर्धेत उच्चांकन करता यावे याकरिता खेळाचा जास्तीत जास्त सराव करण्याच्या दृष्टीने त्यांच्या खेळाचे साहित्य खरेदी करण्यासाठी फक्त एकदा खेळ साहित्यांच्या किंमती एवढी<br>अथवा जास्तीत जास्त **रु.५०,०००/- (रु.पन्नास हजार)** आर्थिक मदत देण्यात येते.<br>(परिपत्रक क्र. ३२८८६, दि. ०२/११/२०११- अ क्र-२०) | भारतीय ऑलिम्पिक संघाशी (Indian Olympic Association) संलग्न असलेल्या मान्यताप्राप्त संघटनेद्वारा आयोजित राष्ट्रीय खेळ (National Games), वरिष्ठ गट राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा (Senior National), कनिष्ठ गट राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत (Junior National) कर्मचाऱ्यांच्या पाल्यांनी सहभागी होऊन प्राविण्य (प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक) मिळविले त्यांना मान्यताप्राप्त आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत जसे ऐशियन गेम्स, ऑलिम्पिक स्पर्धा इत्यादी स्पर्धेत उच्चांकन करता यावे याकरिता खेळाचा जास्तीत जास्त सराव करण्याच्या दृष्टीने त्यांच्या खेळाचे साहित्य खरेदी करण्यासाठी फक्त एकदा खेळ साहित्यांच्या किंमती एवढी अथवा जास्तीत जास्त **रु. १,००,०००/- (रु.एक लाख)** आर्थिक मदत देण्यात येईल. |
| १२ | M.P.S.C. / U.P.S.C. आयोगामार्फत आयोजित खुल्या स्पर्धात्मक परिक्षेत वर्ग १ या पदासाठी निवड झालेल्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना **रु. १०,०००/- (रु.दहा हजार)** रोख पारितोषिक देण्यात येते.<br>(परिपत्रक क्र. ३२८८६, दि. ०२/११/२०११- अ क्र-३)<br>भारतीय प्रशासकीय सेवा परिक्षेच्या पुर्व तयारीसाठी राज्य शासन मान्य संस्थेत प्रशिक्षणासाठी ज्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांची निवड झाली त्यांना **रु. १०,०००/- (रु.दहा हजार)** आर्थिक मदत देण्यात येते.<br>(परिपत्रक क्र. ३२८८६, दि. ०२/११/२०११- अ क्र-१९) | फक्त M.P.S.C. / U.P.S.C. या सारख्या परिक्षांच्या पुर्वपरिक्षा उत्तीर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना मुख्य परिक्षेच्या तयारीसाठी विशेष प्रोत्साहनपर रक्कम **रु. २०,०००/- (रु.वीस हजार)** रोख पारितोषिक देण्यात येईल. |
| १३ | मुलगी जन्मल्यानंतर कर्मचाऱ्यास प्रोत्साहनपर **रु. ५,०००/- (रु.पाच हजार)** या रक्कमेचे राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र भेट म्हणून देण्यात येते. तसेच सदर योजना प्रचलीत नियमांनुसार कर्मचाऱ्यांच्या फक्त २ पाल्यांकरीता अनुज्ञेय राहील.<br>(परिपत्रक क्र. ३२८८६, दि. ०२/११/२०११- अ क्र-४)<br>दत्तक घेतलेल्या मुलीस राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र मिळण्यास **रु. ५,०००/- (रु.पाच हजार)** चा लाभ खालील अटींवर देण्यात येतो.<br>१. अनाथ आश्रम नोंदणीकृत असणे अनिवार्य आहे.<br>२. दत्तक घेताना मुलीचे वय १० वर्षांच्या आत असणे आवश्यक आहे<br>३. सदर प्रस्ताव मुलगी दत्तक घेतलेल्या तारखेपासून १ वर्षाच्या आत सादर करणे बंधनकारक.<br>(परिपत्रक क्र. २४४७७, दि. ०६.१०.२०१७- अ क्र-३) | मुलगी जन्मल्यानंतर कर्मचाऱ्यास प्रोत्साहनपर मुलीच्या नावावरील **रु.२५,०००/- (रु. पंचवीस हजार)** या रक्कमेचे राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र (NSC) सादर केल्यानंतर प्रतिपुर्ती रक्कम अदा करण्यात येईल. सदर योजना कर्मचाऱ्याच्या फक्त २ पाल्यांकरीता अनुज्ञेय राहील.<br>तसेच दत्तक घेतलेल्या मुलीकरीता यापूर्वीच्या अटी व शर्ती कायम ठेवून सदर लाभ अनुज्ञेय राहील. |
| १४ | मान्यताप्राप्त संस्थेद्वारा आयोजित साहसी मोहिम जसे सायकल / मोटरसायकलवरुन जगप्रवास / देशभ्रमण तसेच उच्चांकन करण्यासाठी गिर्यारोहण जसे उंच शिखरे सर करणे इत्यादीसाठी निवड झालेले कर्मचारी सदर साहसी मोहिम यशस्वी करुन परत आल्यानंतर तसेच साहसी मोहिमेत झालेल्या खर्चाचा लेखा-जोखा सादर केल्यानंतर त्यांना **रु.२५,०००/- (रु. पंचवीस हजार)** आर्थिक मदत देण्यात येते.<br>(परिपत्रक क्र. ३२८८६, दि. ०२/११/२०११- अ क्र-१३) | मान्यताप्राप्त संस्थेद्वारा आयोजित साहसी मोहिम जसे सायकल / मोटरसायकलवरुन जगप्रवास / देशभ्रमण तसेच उच्चांकन करण्यासाठी गिर्यारोहण जसे उंच शिखरे सर करणे इत्यादीसाठी निवड झालेले कर्मचारी सदर साहसी मोहिम यशस्वी करुन परत आल्यानंतर तसेच साहसी मोहिमेत झालेल्या खर्चाचा लेखा-जोखा सादर केल्यानंतर त्यांना **रु. ५०,०००/- (रु.पन्नास हजार)** आर्थिक मदत देण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| १५ | अपंग, प्रौढांच्या आंतरराष्ट्रीय क्रीडास्पर्धेत तसेच सांघिक खेळामध्ये प्राविण्य (प्रथम, द्वितिय किंवा तृतीय क्रमांक) संपादन करणाऱ्या कर्मचाऱ्यांना **रु. ५,०००/- (रु. पाच हजार)** रोख पारितोषिक देण्यात येते<br>(परिपत्रक क्र. ३२८८६, दि. ०२/११/२०११- अ क्र-१६)<br>(परिपत्रक क्र. ७३१४, दि. ०४/०३/२०१६) | अपंग, प्रौढांच्या आंतरराष्ट्रीय क्रीडास्पर्धेत तसेच सांघिक खेळामध्ये प्राविण्य (प्रथम, द्वितिय किंवा तृतीय क्रमांक) संपादन करणाऱ्या कर्मचाऱ्यांना **रु.१०,०००/- (रु. दहा हजार)** रोख पारितोषिक देण्यात येईल. |
| १६ | कर्मचाऱ्यांस कायम स्वरुपी अपंगत्व आल्यास जिल्हा शल्य चिकीत्सकांच्या दाखल्याच्या आधारे त्यांना **रु.१०,०००/- (रु. दहा हजार)** आर्थिक मदत देण्यात येते.<br>(परिपत्रक क्र. ३२८८६,दि.०२/११/२०११- अ.क्र-२१) | कर्मचाऱ्यांस कायम स्वरुपी अपंगत्व आल्यास जिल्हा शल्य चिकीत्सकांच्या दाखल्याच्या आधारे त्यांना सेवा काळात फक्त एकदाच **रु. ५०,०००/- (रु. पन्नास हजार)** आर्थिक मदत देण्यात येईल. |
| १७ | कर्मचाऱ्यांच्या सर्वांगिण विकास करणे तसेच विविध सामाजिक उपक्रम राबविण्याकरीता तत्कालीन म.रा वि.मंडळातील विविध परीमंडळे, मंडल कार्यालय, विद्युत केंद्रे इ. ठिकाणी स्थापन करण्यात आलेल्या क्रिडा क्लब (Sports Club) ला पुर्नजिवित करणे तसेच नव्याने क्रिडा क्लबची स्थापना करण्यासाठी मल्टी जिम, व्यायामाचे साहित्य तसेच खेळांचे साहित्य खरेदी करण्याकरीता संबंधीत क्रिडा क्लबच्या वतीने खालील सर्व निकषांची परिपुर्तता करुन सादर केलेल्या प्रस्तावास फक्त एकदा **रु. १,००,०००/- (रु. एक लाख)** आर्थिक मदत देण्यात येते.<br>१. क्रिडा क्लबच्या नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत<br>२. कर्मचारी सदस्यांची यादी (कमीत कमी १०० सदस्य)<br>३. मागील वर्षाचा लेखापरिक्षित अहवाल<br>४. क्रिडा क्लब स्थापन करण्यात आलेल्या जागेचा तपशील (स्थापत्य विभागाच्या शिफारशीसह)<br>(परिपत्रक क्र. ३२८८६, दि. ०२/११/२०११- अ क्र-१२) | कर्मचाऱ्यांच्या सर्वांगिण विकास करणे तसेच विविध सामाजिक उपक्रम राबविण्याकरीता तत्कालीन म.रा वि.मंडळातील विविध परीमंडळे, मंडल कार्यालय, विद्युत केंद्रे इ. ठिकाणी स्थापन करण्यात आलेल्या क्रिडा क्लब (Sports Club) ला पुर्नजिवित करणे तसेच नव्याने क्रिडा क्लबची स्थापना करण्यासाठी मल्टी जिम, व्यायामाचे साहित्य तसेच खेळांचे साहित्य खरेदी करण्याकरीता संबंधीत क्रिडा क्लबच्या वतीने यापूर्वीच्या अटी व शर्तीच्या अधिन राहुन तसेच खालील सर्व निकषांची परिपुर्तता करुन सादर केलेल्या प्रस्तावास फक्त एकदा **रु. ५,००,०००/- (रु. पाच लाख)** आर्थिक मदत देण्यात येईल.<br>१. क्रिडा क्लबच्या नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत<br>२. कर्मचारी सदस्यांची यादी (कमीत कमी १०० सदस्य)<br>३. मागील वर्षाचा लेखापरिक्षित अहवाल<br>४. क्रिडा क्लब स्थापन करण्यात आलेल्या जागेचा तपशील (स्थापत्य विभागाच्या शिफारशीसह)<br>उपरोक्त तरतूद ही १० वषापर्यंतच्या कालावधीसाठी एकदा राहील. १० वर्षानंतर पुनश्च: मागणी करण्यात आल्यास उपरोक्त अटी व शर्तीच्या अधिन राहुन **रु. ५,००,०००/- (रु. पाच लाख)** आर्थिक मदत देण्यात येईल. |
| १८ | क्रीडा क्लबच्या माध्यमातून कर्मचारी व त्यांच्या परिवारासाठी नविन वाचनालय सुरु करण्यासाठी शासनाच्या ग्रंथालय संचालनालयातर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या सर्वसमावेशक पुस्तकांची यादीनुसार वाचनालयासाठी पुस्तके खरेदी करण्याकरीता **रु.२५,०००/- (रु. पंचवीस हजार)** पर्यंत आर्थिक मदत देण्यात येते.<br>(परिपत्रक क्र. ३२८८६, दि. ०२/११/२०११- अ क्र-१५)<br>(परिपत्रक क्र. १८८८१, दि. ०६/०७/२०१२- अ क्र-४) | क्रीडा क्लबच्या माध्यमातून कर्मचारी व त्यांच्या परिवारासाठी नविन वाचनालय सुरु करण्यासाठी शासनाच्या ग्रंथालय संचालनालयातर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या सर्वसमावेशक पुस्तकांची यादीनुसार वाचनालयासाठी पुस्तके खरेदी करण्याकरीता **रु.५०,०००/- (रु.पन्नास हजार)** पर्यंत आर्थिक मदत देण्यात येईल.<br>उपरोक्त तरतूद ही ०५ वषापर्यंतच्या कालावधीसाठी एकदा राहील. ०५ वर्षानंतर पुनश्च: मागणी करण्यात आल्यास उपरोक्त अटी व शर्तीच्या अधिन राहुन **रु.५०,०००/- (रु.पन्नास हजार)** आर्थिक मदत देण्यात येईल. |
| १९ | कंपनीचा कर्मचारी सेवाकाळात मयत पावल्यास त्यांच्या अवलंबितास **रु.१०,०००/- (रु.दहा हजार)** आर्थिक मदत देण्यासाठी तसेच मयत पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या अवलंबीतास सदर रक्कम रोखीने देण्याबाबत क्षेत्रीय कार्यालयातील उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी कार्यवाही करतील.<br>(परिपत्रक क्र. ३२८८६, दि. ०२/११/२०११- अ क्र-८)<br>(परिपत्रक क्र. ५८४६, दि. ०७/०३/२०१२) | कंपनीचा कर्मचारी सेवाकाळात कोणत्याही कारणाने मयत पावल्यास त्यांच्या अवलंबितास **रु.५०,०००/- (रु.पन्नास हजार)** आर्थिक मदत देण्यात येईल. या करीताच्या अटी व शर्ती पुर्वीप्रमाणेच लागू राहतील. |

<table>
<tr>
<td>२०</td>
<td>कर्मचारी कल्याण निधी समितीच्या सर्व सदस्यांना तीन वर्षातून एकदा रु. ३,०००/- (रु. तीन हजार) या रकमेची कार्यालयीन कामकाजासाठी प्रवासी बॅग देण्यात येते.<br>(परिपत्रक क्र. ३२८८६ दि. ०२/११/२०११- अ.क्र-१८)</td>
<td>कर्मचारी कल्याण निधी समितीच्या सर्व सदस्यांना तीन वर्षातून एकदा रु. १०,०००/- (रु. दहा हजार) पर्यंत कार्यालयीन कामकाजासाठी प्रवासी बॅग देण्यात येईल.</td>
</tr>
<tr>
<td>२१</td>
<td>"गुणवंत कामगार पुरस्कार" तसेच "राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर विविध क्षेत्रात प्राविण्य प्राप्त केल्यामुळे दिले जाणारे पुरस्कार" कंपनीच्या सेवेत असताना कंपनीच्या अधिकारी/ कर्मचारी यांनी प्राप्त केले तर त्यांना विशेष रोख पारितोषिक सेवाकालावधी मध्ये फक्त एकदाच देण्यात येतो.<br>(परिपत्रक क्र. ३६४१० दि.०२.१२.२०१० - अ.क्र.६)
<table>
<tr><th colspan="2">पुरस्काराचे नाव</th></tr>
<tr><td>गुणवंत कामगार पुरस्कार</td><td>रु. २,५०१/-</td></tr>
<tr><td>राज्य पातळीवरील पुरस्कार</td><td>रु. ११,०००/-</td></tr>
<tr><td>राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार</td><td>रु. १५,०००/-</td></tr>
</table></td>
<td>"गुणवंत कामगार पुरस्कार" तसेच "राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर विविध क्षेत्रात प्राविण्य प्राप्त केल्यामुळे दिले जाणारे पुरस्कार" कंपनीच्या सेवेत असताना कंपनीच्या अधिकारी/ कर्मचारी यांनी प्राप्त केले तर त्यांना विशेष रोख पारितोषिक सेवाकालावधी मध्ये फक्त एकदाच देण्यात येईल.
<table>
<tr><th colspan="2">पुरस्काराचे नाव</th></tr>
<tr><td>गुणवंत कामगार पुरस्कार</td><td>रु. ५०००/-</td></tr>
<tr><td>राज्य पातळीवरील पुरस्कार</td><td>रु. २१,०००/-</td></tr>
<tr><td>राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार</td><td>रु. २५,०००/-</td></tr>
</table></td>
</tr>
<tr>
<td>२२</td>
<td>राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत भाग घेऊन (प्रथम, द्वितिय किंवा तृतीय क्रमांक) संपादन करणाऱ्या कर्मचाऱ्यांना रोख पारितोषिक सेवाकालावधी मध्ये फक्त एकदाच देण्यात येते. (परिपत्रक क्र. ३६४१० दि.०२.१२.२०१० अ.क्र.७)
<table>
<tr><th>पुरस्काराचे नाव</th><th>मंजूर करण्यात आलेली पुरस्काराची रक्कम</th></tr>
<tr><td colspan="2">वैयक्तिक स्पर्धेत प्राविण्य :</td></tr>
<tr><td>प्रथम क्रमांक (सुवर्ण पदक)</td><td>रु. ६,०००/-</td></tr>
<tr><td>द्वितीय क्रमांक (रौप्य पदक)</td><td>रु. ४,०००/-</td></tr>
<tr><td>तृतिय क्रमांक (कास्य पदक)</td><td>रु. २,०००/-</td></tr>
<tr><td colspan="2">सांघिक स्पर्धेत प्राविण्य :</td></tr>
<tr><td>प्रथम क्रमांक (सुवर्ण पदक)</td><td>रु. ६,०००/-</td></tr>
<tr><td>द्वितीय क्रमांक (रौप्य पदक)</td><td>रु. ४,०००/-</td></tr>
<tr><td>तृतिय क्रमांक (कास्य पदक)</td><td>रु. २,०००/-</td></tr>
</table></td>
<td>राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत भाग घेऊन (प्रथम, द्वितिय किंवा तृतीय क्रमांक) संपादन करणाऱ्या कर्मचाऱ्यांना रोख पारितोषिक देण्यात येईल.
<table>
<tr><th>पुरस्काराचे नाव</th><th>मंजूर करण्यात आलेली पुरस्काराची रक्कम</th></tr>
<tr><td colspan="2">वैयक्तिक स्पर्धेत प्राविण्य :</td></tr>
<tr><td>प्रथम क्रमांक सुवर्ण पदक)</td><td>रु. १५,०००/-</td></tr>
<tr><td>द्वितीय क्रमांक (रौप्य पदक)</td><td>रु. १०,०००/-</td></tr>
<tr><td>तृतिय क्रमांक (कास्य पदक)</td><td>रु. ५,०००/-</td></tr>
<tr><td colspan="2">सांघिक स्पर्धेत प्राविण्य :</td></tr>
<tr><td>प्रथम क्रमांक (सुवर्ण पदक)</td><td>रु. १५,०००/-</td></tr>
<tr><td>द्वितीय क्रमांक (रौप्य पदक)</td><td>रु. १०,०००/-</td></tr>
<tr><td>तृतिय क्रमांक (कास्य पदक)</td><td>रु. ५,०००/-</td></tr>
</table></td>
</tr>
<tr>
<td>२३</td>
<td>अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या क्रीडा स्पर्धेत भाग घेवून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक (सुवर्णपदक, रौप्यपदक व कास्यपदक) मिळविणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना रोख पारितोषिके (वैयक्तिक व सांघिक स्पर्धेसाठी) देण्यात येते.<br>(परिपत्रक क्र. २००८५, दि. २७.०६.२०११- अ. क्र.६)
<table>
<tr><th>पुरस्काराचे नाव</th><th>मंजूर करण्यात आलेली पुरस्काराची रक्कम</th></tr>
<tr><td colspan="2">वैयक्तिक स्पर्धेत प्राविण्य :</td></tr>
<tr><td>प्रथम क्रमांक (सुवर्ण पदक)</td><td>रु. ५,०००/-</td></tr>
<tr><td>द्वितीय क्रमांक (रौप्य पदक)</td><td>रु. ४,०००/-</td></tr>
<tr><td>तृतिय क्रमांक (कास्य पदक)</td><td>रु. ३,०००/-</td></tr>
<tr><td colspan="2">सांघिक स्पर्धेत प्राविण्य :</td></tr>
<tr><td>प्रथम क्रमांक (सुवर्ण पदक)</td><td>रु. २,०००/-</td></tr>
<tr><td>द्वितीय क्रमांक (रौप्य पदक)</td><td>रु. १,५००/-</td></tr>
<tr><td>तृतिय क्रमांक (कास्य पदक)</td><td>रु. १,०००/-</td></tr>
</table></td>
<td>अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या क्रीडा स्पर्धेत भाग घेवून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक (सुवर्णपदक, रौप्यपदक व कास्यपदक) मिळविणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना रोख पारितोषिके (वैयक्तिक व सांघिक स्पर्धेसाठी) देण्यात येईल.<br>सांघिक खेळासाठीच्या रोख पारितोषिका करीता संबंधित खेळाचे प्रशिक्षक व संघ व्यवस्थापक देखील पुरस्काराच्या रक्कमेसाठी पात्र असतील.
<table>
<tr><th>पुरस्काराचे नाव</th><th>मंजूर करण्यात आलेली पुरस्काराची रक्कम</th></tr>
<tr><td colspan="2">वैयक्तिक स्पर्धेत प्राविण्य :</td></tr>
<tr><td>प्रथम क्रमांक (सुवर्ण पदक)</td><td>रु. १०,०००/-</td></tr>
<tr><td>द्वितीय क्रमांक (रौप्य पदक)</td><td>रु. ८,०००/-</td></tr>
<tr><td>तृतिय क्रमांक (कास्य पदक)</td><td>रु. ६,०००/-</td></tr>
<tr><td colspan="2">सांघिक स्पर्धेत प्राविण्य :</td></tr>
<tr><td>प्रथम क्रमांक (सुवर्ण पदक)<br>(प्रति खेळाडू)</td><td>रु. ४,०००/-</td></tr>
<tr><td>द्वितीय क्रमांक (रौप्य पदक)<br>(प्रति खेळाडू)</td><td>रु. ३,०००/-</td></tr>
<tr><td>तृतिय क्रमांक (कास्य पदक)<br>(प्रति खेळाडू)</td><td>रु.२,०००/-</td></tr>
</table></td>
</tr>
</table>

<table>
<tr><td>२४</td><td>राज्य नाट्यस्पर्धेत किंवा कामगार कल्याण केंद्र नाट्यस्पर्धेच्या प्रथम फेरीत तसेच अंतिम फेरीत मंडळाच्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या नाटकास बक्षिस मिळाल्यास, बक्षिसाच्या रक्कमे इतकीच रोख पारितोषिकाची रक्कम म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधीमधून देण्यात येते. तसेच वैयक्तिक बक्षिस प्राप्त कर्मचाऱ्यांस (उदा. अभिनय, दिग्दर्शन, संगीत नेपथ्य, प्रकाशयोजना इत्यादी) तेवढ्याच रकमेचे बक्षिस कर्मचारी कल्याण निधीतून देण्यात येते. तसेच परिमंडळ स्तरावरील स्पर्धेत सहभागी झालेल्या नाटकाने राज्य नाट्यस्पर्धेत किंवा कामगार कल्याण केंद्र नाट्यस्पर्धेत सहभाग घेतल्यास कर्मचारी कल्याण निधीतून आर्थिक मदत देण्यात येते.<br>(परिपत्रक क्र. १०६४७, दि. १०/०५/२०१८)</td><td>राज्य नाट्यस्पर्धेत किंवा कामगार कल्याण केंद्र नाट्यस्पर्धेच्या प्रथम फेरीत तसेच अंतिम फेरीत मंडळाच्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या नाटकास बक्षिस मिळाल्यास, बक्षिसाच्या रक्कमे इतकीच रोख पारितोषिकाची रक्कम म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधीमधून देण्यात येईल. तसेच वैयक्तिक बक्षिस प्राप्त कर्मचाऱ्यांस (उदा. अभिनय, दिग्दर्शन, संगीत नेपथ्य, प्रकाशयोजना इत्यादी) तेवढ्याच रकमेचे बक्षिस कर्मचारी कल्याण निधीतून देण्यात येईल.<br>तसेच परिमंडळ स्तरावरील स्पर्धेत सहभागी झालेल्या नाटकाने राज्य नाट्यस्पर्धेत किंवा कामगार कल्याण केंद्र नाट्यस्पर्धेत सहभाग घेवून अंतिम फेरीसाठी सदर नाट्यसंघ पात्र टरल्यास अशा नाट्यसंघास सराव व सादरीकरणासाठी रक्कम रु. ५०,००० /- (रु. पन्नास हजार) कर्मचारी कल्याण निधीतून आर्थिक मदत देण्यात येईल.</td></tr>
<tr><td>२५</td><td>कर्मचाऱ्याच्या पाल्यांनी राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीय स्तरावरील खुल्या तथा शालेय म्हणजेच भारतीय शालेय खेळ महासंघ (School Games Federation Of India) यांनी आयोजीत केलेल्या स्पर्धेत वैयक्तिक व सांघिक खेळात सहभागी होऊन प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक संपादन केल्यास खालील प्रमाणे रोख परितोषिक देण्यात येते. सदर पारितोषिक सेवाकाळात एकदाच देण्यात येते.<br>(परिपत्रक क्र. १०६४७, दि. १०/०५/२०१८)
<table>
<tr><th>स्पर्धेचा स्तर</th><th>प्रथम क्रमांक</th><th>द्वितीय क्रमांक</th><th>तृतीय क्रमांक</th></tr>
<tr><td>राष्ट्रीय</td><td>रु. ११,२५०/-</td><td>रु. ८,९५०/-</td><td>रु. ६,७५०/-</td></tr>
<tr><td>आंतरराष्ट्रीय</td><td>रु. ३०,०००/-</td><td>रु. २२,५००/-</td><td>रु. १५,०००/-</td></tr>
</table></td><td>कर्मचाऱ्याच्या पाल्यांनी राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीय स्तरावरील खुल्या तथा शालेय म्हणजेच भारतीय शालेय खेळ महासंघ (School Games Federation Of India) यांनी आयोजीत केलेल्या स्पर्धेत वैयक्तिक व सांघिक खेळात सहभागी होऊन प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक संपादन केल्यास खालील प्रमाणे रोख परितोषिक देण्यात येईल. सदर पारितोषिक सेवाकाळात एकदाच देण्यात येईल.
<table>
<tr><th>स्पर्धेचा स्तर</th><th>प्रथम क्रमांक</th><th>द्वितीय क्रमांक</th><th>तृतीय क्रमांक</th></tr>
<tr><td>राष्ट्रीय</td><td>रु. २५,०००/-</td><td>रु. १५,०००/-</td><td>रु. १२,०००/-</td></tr>
<tr><td>आंतरराष्ट्रीय</td><td>रु. ५०,०००/-</td><td>रु. ४०,०००/-</td><td>रु. ३०,०००/-</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>२६</td><td>कर्मचाऱ्यांच्या पाल्यांनी राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झाल्यास महाराष्ट्र शासन निर्णय क्र. रा क्रीधो/ २०१२ (प्र.क्र १४५ /१२) क्रीयुसे २ दि. ०४.०७.२०१३ नुसार रोख पारितोषिक देण्यात येते.<br>राष्ट्रीय स्तरावरील सहभागाकरीता रु. ३,७५०/-<br>आंतरराष्ट्रीय स्तरावरील सहभागाकरीता रु. ११,२५०/-<br>(परिपत्रक क्र. १५१३९, दि. २२.०६.२०१८ अ. क्र. ५)</td><td>कर्मचाऱ्यांच्या पाल्यांनी राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झाल्यास महाराष्ट्र शासन निर्णय क्र. रा क्रीधो/ २०१२ (प्र.क्र १४५ /१२) क्रीयुसे २ दि. ०४.०७.२०१३ नुसार रोख पारितोषिक देण्यात येईल.<br>राष्ट्रीय स्तरावरील सहभागाकरीता रु. १०,०००/-<br>आंतरराष्ट्रीय स्तरावरील सहभागाकरीता रु. २५,०००/-</td></tr>
<tr><td>२७</td><td>Maharashtra University of Health Sciences अंतर्गत येणाऱ्या (ठराविक ०९) वैद्यकीय अभ्यासक्रमाकरीता कर्मचाऱ्याच्या मुलीने प्रवेश घेतल्यास प्रोत्साहनपर रोख पारितोषीक रु. ३,०००/- (रु. तीन हजार) देण्यात येते.<br>१) Bachelor of Ayurvedic Medical Sciences (BAMS)<br>२) Bachelor of Dental Surgery (BDS)<br>३) Bachelor of Homeopathic Medicine & Surgery (BHMS)<br>४) Bachelor of Physiotherapy (BPT)<br>५) Bachelor of Occupational Therapy (B.O.TH.)<br>६) Bachelor of Unani Medicine & Surgery (BUMS)<br>७) Bachelor in Prosthetic & Orthotics (BPO)<br>८) Post Basic Bachelor of Science (P.B.B.Sc) (Nursing)\<br>९) Bachelor of Audiology & Speech- Language Pathology (BASLP)<br>(परिपत्रक क्र. ५०६६, दि. १८/०२/२०१९ अ. क्र. १)</td><td>सन २०२५-२६ या शैक्षणिक सालापासुन कर्मचाऱ्याच्या पाल्याने Maharashtra University of Health Sciences अंतर्गत येणाऱ्या खालील ०९ वैद्यकीय अभ्यासक्रमाकरीता प्रवेश घेतल्यास प्रोत्साहनपर रोख पारितोषीक रु. १०,०००/- (रु.दहा हजार) देण्यात येईल.<br>१) Bachelor of Ayurvedic Medical Sciences (BAMS)<br>२) Bachelor of Dental Surgery (BDS)<br>३) Bachelor of Homeopathic Medicine & Surgery (BHMS)<br>४) Bachelor of Physiotherapy (BPT)<br>५) Bachelor of Occupational Therapy (B.O.TH.)<br>६) Bachelor of Unani Medicine & Surgery (BUMS)<br>७) Bachelor in Prosthetic & Orthotics (BPO)<br>८) Post Basic Bachelor of Science (P.B.B.Sc) (Nursing)\<br>९) Bachelor of Audiology & Speech- Language Pathology (BASLP)</td></tr>
<tr><td>२८</td><td>वेतनगट ३ व ४ मधील कर्मचाऱ्याच्या पाल्याची परदेशी उच्च शिक्षणासाठी निवड झाल्यास रु. १०,०००/- (रु. दहा हजार) प्रोत्साहनपर रोख पारितोषिक देण्यात येते.<br>(परिपत्रक क्र. ५०६६, दि. १८/०२/२०१९ अ. क्र. २)</td><td>कर्मचाऱ्याच्या पाल्याची परदेशी उच्च शिक्षणासाठी निवड झाल्यास रु. २५,०००/- (रु.पंचवीस हजार) प्रोत्साहनपर रोख पारितोषिक देण्यात येईल.</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| २९ | तिन्ही कंपन्यांतील अधिकारी कर्मचाऱ्यांचे आपसांतील संबंध सुदृढ व्हावे याकरीता क.क.नि.समितीच्या वतीने प्रतिवर्षी आंतर कंपनी क्रिडा स्पर्धा व नाटयस्पर्धा आयोजित करण्यासाठी परिपत्रक क्र ३२८८६ दि ०२.११.२०११ अ.क्र.६ व परिपत्रक क्र ८९ दि. ०१.०१.२०१५ अन्वये आंतर कंपनी क्रिडा स्पर्धा आयोजनाकरीता रु ४,००,०००/- **(रु. चार लाख)** व आंतर कंपनी नाटस्पर्धा आयोजनाकरीता रु २,००,०००/- **(रु. दोन लाख)** अनुदान देण्यात येते. | तिन्ही कंपन्यांतील अधिकारी कर्मचाऱ्यांचे आपसांतील संबंध सुदृढ व्हावे याकरीता क.क.नि.समितीच्या वतीने प्रतिवर्षी आंतर कंपनी क्रिडा स्पर्धा आयोजनाकरीता रु ६,००,०००/- **(रु. सहा लाख)** व आंतर कंपनी नाटस्पर्धा आयोजनाकरीता रु ५,००,०००/- **(रु. पाच लाख)** अनुदान देण्यात येईल. यासंदर्भातील क्रिडा व नाटस्पर्धा बाबतच्या अटी व शर्ती पुर्वीप्रमाणेच राहतील. |

३. कर्मचारी व त्यांच्या अवलंबितांच्या कल्याणाच्या दृष्टीने विचार करुन उपरोक्त योजनांव्यतिरिक्त खालील नवीन योजनांचा समावेश करण्यात येत आहे.

१. **Autism Spectrum Disorder (ASD)** हा आजार मेंदूच्या विकासाशी संबंधीत असून यामध्ये लहान मुलांच्या संवाद आणि वर्तनावर परिणाम होऊन, इतरांशी संवाद साधताना अडचणी येतात. सबब, म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधीमधून वैद्यकीय आर्थिक मदत देण्यात येणाऱ्या आजारांच्या यादीमध्ये **Autism Spectrum Disorder (ASD) या नविन आजाराचा समावेश करण्यात येत असून या आजाराकरीता रु. ५०,०००/- (रु. पन्नास हजार) फक्त एकदाच आर्थिक मदत देण्यात येईल.**

२. तिन्ही कंपनीतील कार्यरत कर्मचाऱ्यांनी Charted Accountant (C.A.) / Institute of Cost and Works Accountants (ICWA) / Doctor of Philosophy (Ph.D) सदर पदवी सेवाकालावधी मध्ये प्राप्त केली असेल आणि कंपनीच्या नियुक्तीसाठी सदर पदवी अनिवार्य नसेल अशा कर्मचाऱ्यांना **सेवाकालावधी मध्ये फक्त एकदाच रु. १,००,०००/- (रु.एक लाख) रक्कमेचे रोख पारितोषिक** देण्यात येईल. मात्र सदर पदवी प्राप्त कर्मचाऱ्यांनी यासंदर्भात कंपन्याकडून यापूर्वी कोणत्याही प्रकारची वेतनवाढ अथवा लाभ घेतलेला असल्यास सदर कर्मचारी याकरीता पात्र राहणार नाही.

३. केंद्र शासनाच्या ब्युरो ऑफ एनर्जी इफिशिएन्सी (BEE) संस्थेमार्फत घेण्यात येणाऱ्या Energy Manager / Energy Auditor प्रमाणपत्र मिळविणाऱ्या कर्मचाऱ्यांना Energy Manager साठी **रु.२०,०००/- (वीस हजार)** व Energy Auditor साठी **रु.२५,०००/- (पंचवीस हजार)** रोख रक्कमेचे पारितोषिक देण्यात येईल.

४. महाराष्ट्र शासनाची प्राथमिक शिष्यवृत्ती व माध्यमिक शिष्यवृत्ती मंजूर झालेली आहे. अशा पाल्यांना **महाराष्ट्र शासनाप्रमाणेच प्राथमिक शिष्यवृत्ती दरमहा रु. ५००/- म्हणजेच वार्षिक रु. ६,०००/- (रु. सहा हजार) व माध्यमिक शिष्यवृत्ती दरमहा रु. ७५०/- म्हणजेच वार्षिक रु. ९,०००/- (रु. नऊ हजार)** शिष्यवृत्ती देण्यात येईल.

५. कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी विविध विषयांवर साहित्य लेखन करुन त्यांचा कथा संग्रह किंवा कविता संग्रह प्रकाशीत झाला आहे अशा **कर्मचाऱ्यांना सेवाकालावधी मध्ये फक्त एकदाच रु.१०,०००/- (रु. दहा हजार) रोख पारितोषिक** देण्यात येईल. मात्र, सदर कथा संग्रह व कविता संग्रहाचा आशय पाहून याबाबत रोख पारितोषिक देण्यासंदर्भात समितीस्तरावर निर्णय घेण्यात येईल.

सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या E-Library व Employee Portal अंतर्गत Industrial Relations Department येथे प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

(राजेंद्र पवार)
**संचालक (मासं)**
**महावितरण**

**प्रत सस्नेह सादर :**
संचालक (वित्त), म.रा.वि.मं. सुत्रधारी कं. मर्या., हॉगकॉग बँक, इमारत फोर्ट, मुंबई.

**प्रत रवाना :**
१. कार्यकारी संचालक (मासं), महावितरण / महानिर्मिती / महापारेषण, सांघिक कार्यालय, मुंबई.
२. मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महावितरण / महानिर्मिती / महापारेषण, सांघिक कार्यालय, मुंबई.